# पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे

३ रा मजला ,नवीन मध्यवर्ती इमारत , पुणे ४११००१
दूरध्वनी क्र०२०-२६१२६६२८/२६१२६७८५/२६११४०६४
ईमेल -dirnktms@gmail.com web :-mahapanan.maharashtra.gov,in

---

जा.क्र पणन -५/स्थापत्य /स्वारस्य अभिव्योक्ती /माहिती/परिपत्रक/२०२१ दि.१५ / ०२ /२०२१
1622

विषय :- कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये "स्वारस्य अभिव्योक्ती ( Expression of interest) "ही संकल्पना राबविणेबाबत .

संदर्भ :- मा.मंत्री सहकार व पणन , महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र जा.क्र मंत्री/सह, पणन/ व्ही.आय.पी/नोट३३३७/२०२१,दि. ०३/०२/२०२१चे पत्र.

## परिपत्रक

कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये बाजार समित्यांच्या आवारामध्ये विविध विकास कामे केली जातात. उदा. लिलाव गृहे, गोदामे, अंतर्गत रस्ते ,प्रशासकीय इमारती, व्यापारी गाळे इ. या विकासकामांच्या बांधकामासाठी या कार्यालयाकडून महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी –विक्री (विकास व विनियमन )अधिनियम १९६३ चे कलम १२( १ )अन्वये मंजुरी दिली जाते . ही सर्व विकासकामे बाजार समितीकडे असलेल्या स्वनिधी मधून केली जातात . जर बाजार समित्यांकडे पुरेशा प्रमाणामध्ये स्वनिधी उपलब्ध नसेल तर बाजार समित्या महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ अथवा वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांकडून कर्ज घेऊन करतात. मात्र काही बाजार समित्यांची आर्थिक परिस्थिती विचारात घेता त्यांना कृषी पणन मंडळ अथवा वित्त पुरवठा करणाऱ्या संस्थांकडून कर्ज मिळण्याच्या निकषाची पुर्तता करु शकत नाहीत . त्यामुळे निधीअभावी या बाजार समित्यांना विकास कामे करता येणे शक्य होत नाही. अशा बाजार समित्यांनाही विकास कामे करण्यासाठी "स्वारस्य अभिव्योक्ती ( Expression of interest)"द्वारे निधीची उपलब्धता होऊ शकेल. जेणेकरून बाजार समित्यांना विकास कामे विशेषतः व्यापारी गाळे बांधकाम करता येऊ शकतील.

गावांचे/शहरांचे विस्तारीकरण झाल्यामुळे बऱ्याच बाजार समित्यांच्या मालकीच्या जागा आता शहरालगत आल्यामुळे या जागांवर व्यावसायिक गाळ्यांसंबंधीची मागणी मोठ्या प्रमाणावर असते. त्यामुळे